श्रीमती शुभांगी गुर्वे, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदावरील नेमणूकीचा मानीव दिनांक देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः आपना-४५१२/प्र.क्र.२१०/पापु-१५

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई ४०० ००१.
तारीख: २४ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१) **श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे, कनिष्ठ भूवैज्ञानिक यांचा विनंती अर्ज दिनांकः** २८/०२/२०१७.

२) **शासन आदेश, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** आपना-४५१२/प्र.क्र.२१०/पापु-१५, दिनांक १८/०५/२०१५.

३) **शासन आदेश, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** आपना-४५१२/प्र.क्र.२१०/पापु-१५, दिनांक १२/०९/२०१४.

४) **महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम क्रमांकः** ५(१) व (२).

प्रस्तावना :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील कनिष्ठ भूवैज्ञानिक (गट-ब) या पदावर नामनिर्देशनाने वेतनबँड रू. ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन रू. ४५००/- अधिक त्यावर नियमानुसार मिळणारे महागाई व इतर भत्ते या वेतनश्रेणीमध्ये संबंधित उमेदवार ज्या दिनांकापासून पदभार स्वीकारतील त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीसाठी संदर्भाधीन क्रमांक ३ येथील आदेशान्वये नेमणूक करण्यात आली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदावर शिफारस केलेल्या एकूण ३३ उमेदवारांमध्ये अ.क्र. ११ येथे श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे यांच्या नावाचा देखील समावेश होता.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी अ.क्र. ११ येथील उमेदवार श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे यांची कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदावरील शिफारस

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अराखीव प्रवर्गातील महिलांकरीता राखीव असलेल्या पदावर प्राप्त झाली होती.

महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांची प्रमाणपत्रे त्यांच्या नेमणूकीपुर्वी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून तपासून घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांची प्रमाणपत्रे शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ मधील २ (अ) (८) नुसार एक महिन्याच्या आत तपासून तशी प्राप्त न झाल्यास सदर प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तथापि, श्रीमती गुर्वे यांचे नाव वगळता अन्य ३१ उमेदवारांच्या पदस्थापनेचे आदेश संदर्भाधीन क्रमांक ३ येथील आदेशान्वये निर्गमित करण्यात आले होते. तदनंतर उपायुक्त, महिला विकास, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक ०५/०५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती शुभांगी गुर्वे यांच्या अराखीव प्रवर्गातील महिलांकरीता राखीव असलेल्या पदावर नियुक्तीकरीता वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांना संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन आदेशान्वये कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदावर दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आली.

श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे यांनी संदर्भाधीन क्रमांक १ येथील निवेदनाद्वारे अन्य उमेदवारांप्रमाणे ज्येष्ठतेबाबत दिनांक १२/०९/२०१४ हा मानीव दिनांक म्हणून देण्याची व ज्येष्ठता यादीत गुणवत्ता क्रमांकाप्रमाणे सुधारणा करण्याची विनंती शासनास केली आहे.

शासन निर्णय :-

श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी वरीलप्रमाणे केलेली विनंती व त्यांना कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदावर नियुक्ती देण्यास झालेला विलंब हा प्रशासकीय कारणास्तव असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम क्रमांक ५ (१) व (२) नुसार श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे यांना कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या पदावरील दिनांक १२/०९/२०१४ हा नेमणूकीचा मानीव दिनांक म्हणून देण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. तथापि हा दिनांक केवळ ज्येष्ठतेसाठी ग्राह्य राहील.

श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम क्रमांक ५ (१) व (२) नुसार कनिष्ठ भूवैज्ञानिक, या पदावरील दिनांक १२/०९/२०१४ हा नेमणूकीचा मानीव दिनांक म्हणून देण्यात आल्याने त्यांची सहाय्यक भूवैज्ञानिक पदावरील पदोन्नतीसाठी पात्र कनिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या दिनांक

०१/०१/२०१६, दिनांक ०१/०१/२०१७ व दिनांक ०१/०१/२०१८ रोजीच्या तात्पुरत्या सामायिक ज्येष्ठतासूचीमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

कनिष्ठ भूवैज्ञानिक यांचे नाव : श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे			
नेमणूकीचा (ज्येष्ठतेचा) मानीव दिनांक : १२/०९/२०१४			
ज्येष्ठतासूचीचे वर्ष	**सुधारीत अनुक्रमांक**	**ज्येष्ठता यादीतील क्रमांकानंतर**	**ज्येष्ठता यादीच्या क्रमांकापुर्वी**
२०१६	२२२-अ	श्री. पी.व्ही.वानकावार यांच्या नंतर	श्री. यु.डी.बर्डे यांच्या पुर्वी
२०१७	२२२-अ	श्री. पी.व्ही.वानकावार यांच्या नंतर	श्री. यु.डी.बर्डे यांच्या पुर्वी
२०१८	२२२-अ	श्री. पी.व्ही.वानकावार यांच्या नंतर	श्री. यु.डी.बर्डे यांच्या पुर्वी

सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७५८/२०१९/साप्रवि/१२, दिनांक १७/०७/२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३५२/१९/सेवा-३ दिनांक १४/०८/२०१९ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 201909241530161428 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.09.24 18:27:49 +05'30'

(चेतन निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे-०५.
२. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग(कार्यासन-१२) मंत्रालय, मुंबई.
३. उपसचिव, वित्त विभाग (कार्यासन सेवा-३) मंत्रालय, मुंबई.

४. श्रीमती शुभांगी साहेबराव गुर्वे, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (संचालनालयामार्फत).

५. कनिष्ठ भूवैज्ञानिक (सर्व), भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (संचालनालयामार्फत).

६. निवडनस्ती (कार्यासन, पापु-१५).